प्रेसनोट दि.१०/०९/२०१८

**“रस्ता चुकलेल्या जेष्ठ महिलेस तिचे नातेवाईकांचे ताब्यात दिले बाबत..”**

**मार्शलवर पो.ना.३०३६,वाय.एल.आढारी व पो.शि.९०५६,बी.व्ही.काटे यांची चांगली कामगिरी**

**मुंढवा पो स्टे पुणे शहर**

---

दि.०६/०९/२०१८ रोजी जेष्ठ महिला श्रीमती.फुलाबाई किसन गावडे,वय-७५ वर्ष,रा.राऊतवाडी,केंदुर, ता.शिरुर,जि.पुणे त्यांचे मुलीस भेटण्यासाठी पुणे येथे जात असताना मुंढवा या ठिकाणी रस्ता चुकल्या. त्यामुळे त्यांना त्यांचे मुलीचे घरचा पत्ता न सापडल्याने,त्या मुंढवा पोलीस ठाणे हद्दीत फिरत असताना,रात्रपाळीस घोरपडी मार्शलवर कर्तव्यावर असलेले पो.ना.३०३६,वाय.एल.आढारी व पो.शि.९०५६,बी.व्ही.काटे यांना सदर जेष्ठ महिला ही रात्रौ २१/३० वा.घोरपडी हद्दीमध्ये दिसून आल्याने,त्यांनी सदर महिलेस प्रथम विचारपूस केली असता,त्यांनी मला मुलीकडे जायचे आहे,परंतु तीचे घराचा पत्ता माहित नाही तसेच त्यांना वयोमानानुसार काही आठवत नसल्याने पोलीसांनी चुकलेल्या जेष्ठ महिलेस मुंढवा पोलीस ठाणे येथे आणुन महिला कर्मचाऱ्यांच्या मदतीने विचारपूस करुन व राऊतवाडी,केंदूर येथील स्थानिक नागरीकांशी संपर्क साधून,सदर महिलेच्या नाव पत्त्यावरुन त्यांचे मुलाचा नाव पत्ता मिळवून,तीस त्यांच्या मुलाच्या राहते घरी रात्रौ १२/०० वा.पुर्वीच सुखरुप ताब्यात दिले आहे.

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**